।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATION SECTION



Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com


संदर्भ : परीक्षा/कला/२०१८—१९/२१९१ दिनांक : २५/०१/२०१९

## सुचना

उन्हाळी २०१९ परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याबाबत .
विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सुचना.

अभ्यासक्रमांचे नांव :— BA, B.Com, B.Sc, BBA, B.Voc-all, BSW, BA(Animation), BA(Lalitkala), BA(MCJ), BA(Rural Mgt.), BA(Fashion design / FDD), BA(Admins Services), BA(Interdispalnary), ï FY,SY,TY.B.Sc.(IT), B.Sc.(NT), BSc.(HS), FY,SY,TY.

०१. विद्यार्थ्यांनी संबंधीत महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाची तारीख.
अ. नियमित परीक्षा शुल्कासह दि. ०९/०२/२०१९.
ब. विलंब शुल्क रु. १००/—सह दि. १६/०२/२०१९. (महाविद्यालयामध्ये)
क. दि. १८.०२.२०१९ ते २८.०२.२०१९ पर्यंत प्रति दिवस रू. ५०/— विलंब शुल्क आकारून परीक्षा आवेदनपत्र केवळ परीक्षा विभागातच स्विकारले जातील, असे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाने स्विकारू नये व या तारखेनंतर विद्यार्थ्यांचे विलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागास पाठवू नयेत.
क. SEC (कौशल्य विकास) साठी व्दितीय व तृतीय वर्षासाठी प्रति सत्र रु ५०/— परीक्षा शुल्क आकारावे.

०२. महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क NEFT / RTGS ई—पेमेंटव्दारे अभ्यासक्रम निहाय जसे की BA, B.Sc, B.A(MCJ) असे विद्याशाखानिहाय वित्त व लेखा अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या नावे दि.२०.०२.२०१९ रोजी IDBI बॅकेच्या खात्यामध्ये NEFT/RTGS व्दारे जमा करणे आवश्यक आहे. विहीत तारखे नंतर जमा केल्यास १० दिवसा पर्यंत प्रतीदिन रू. ५००/— तर १० दिवसानंतर प्रतीदिन रू. १०००/— विलंब शुल्क आकारण्यात येईल.

NEFT द्वारे परीक्षा शुल्क भरताना अभ्यासक्रमनिहाय भरावे; अन्यथा परीक्षा आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाहीत. तसेच धनाकर्ष किंवा NEFT विद्याशाखानिहायच काढावा, अतिरिक्त असलेली रक्कम वर्ग केली जाणार नाही त्यामुळे अतिरिक्त रक्कमेचा धनाकर्ष काढू नये.

**Mode of Payment : e - payment**

a) **Payment through RTGS/ NEFT :**
**Name of the A/C holder–Finance & Accounts Officer, S.R.T.M. University, Nanded.**
**Name of Bank : IDBI Bank, Lahoti Complex, Vazirabad, Nanded.**
**IFSC Code : IBKL0000500**
**A/C Number 500104000028422**

३. महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने सादर करुन विहीत शुल्काचा RTGS/NEFT/e-payment व्दारे भरल्याची पावतीसह परीक्षा विभागात सादर करण्याचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे. त्यानुसारच आवदेन पत्र सादर करावेत.

| अ.क्र. | जिल्हा | महाविद्यालय क्रमांक | तारीख |
|---|---|---|---|
| १ | नांदेड | १०१ ते १२१ | २२.०२.२०१९ |
| २ | नांदेड | १२२ ते उर्वरीत सर्व | २३.०२.२०१९ |
| १ | परभणी/हिंगोली | २०१ ते २१४ | २२.०२.२०१९ |
| २ | परभणी/हिंगोली | २१५ ते उर्वरीत सर्व | २३.०२.२०१९ |
| १ | लातूर | ३०१ ते ३१४ | २२.०२.२०१९ |
| २ | लातूर | ३१५ ते उर्वरीत सर्व | २३.०२.२०१९ |

विहीत तारखेस परीक्षा आवेदनपत्र सादर न केल्यास महाविद्यालयास प्रती विद्यार्थी प्रती दिन रू. २/— किंवा रू. १०००/— या पैकी जे जास्त असेल तो विलंब शुल्क आकारण्यात येईल.

०४. उपरोक्त ऑनलाईन सादर केलेल्या परीक्षा आवेदन पत्राच्या प्रती व स्टेटमेंट विद्यापीठात सादर करण्याचा दि. २५.०२.२०१९.

०५. वर नमुद केलेले आवेदनपत्र विद्यापीठ प्रकाशन विभागात रू. ०५/— भरून घ्यावेत. अथवा विद्यापीठाच्या संकेत स्थळावरून (www.srtmun.ac.in.) डाउन लोड करून घेता येईल. जे विद्यार्थी सदर आवेदनपत्र संकेत स्थळावरून घेतील त्यांचे शुल्क रू. ०५/— अधीकचे भरून घ्यावेत.

०६. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी स्वतंत्र परीक्षा आवेदन पत्र भरण्यात यावे. वरील आवेदनपत्रे महाविद्यालयांनी केवळ खास दुतामार्फतच पाठवावीत पोष्टाने किंवा अन्य मार्गाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

०७. विद्यार्थ्यांच्या निकालातील त्रूटी जसे की पात्रता क्रमांक, राखीव निकाल, प्रशासकीय कारणास्तव राखीव निकालाच्या पुर्ततेसाठी महाविद्यालयांच्या प्रतीनिधीने विद्यापीठात संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करावी. कोणत्याही परिस्थीतीत विद्यार्थ्यांना पाठवू नये.

०८. (F-ATKT / ATKT ) विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी / पूनर्मुल्यांकनासाठी अर्ज सादर केलेला असेल तरीही सदरील विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्र सादर करणे बंधनकारक आहे. पुनर्मुल्याकंनाचा निकाल जाहीर झाला नाही या सबबीखाली कुठल्याही परिस्थितीत परीक्षा आवेदनपत्र विहीत तारखेनंतर स्विकारले जाणार नाहीत.

०९. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सन २०१८—२०१९ मध्ये दुष्काळसदृश्य (Trigger -2) लागू केलेल्या तालूक्यातील रहीवासी नियीमत विद्यार्थ्यांची उन्हाळी २०१९ साठी परीक्षा शुल्क स्विकारू नये. हे विद्यार्थी शासनाच्या परिपत्रकानुसार परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र असल्याची खात्री करावी. तसेच स्कॉलरशिप किंवा इतर सवलती लागू असलेल्या दुष्काळसदृश्य विद्यार्थ्यांस परीक्षा शुल्क स्विकारावे. या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क शासनाने प्रतिपुर्ती विद्यापीठास केली नाही तर महाविद्यालयाला हे परीक्षा शुल्क भरावे लागेल. दुष्काळसदृश्य विद्यार्थ्यांची यादी अभ्यासक्रमनिहाय स्वंतत्र पणे खालील तक्तात परीक्षा आवेदनपत्रासोबत सादर करावी. त्याशिवाय परीक्षा आवेदनपत्र स्विकारण्यात येणार नाही.

उन्हाळी २०१९ परीक्षेकरीता महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानूसार परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र विद्यार्थ्याची अभ्यासक्रंम निहाय स्वतंत्र यादी खालील तक्त्यात सादर करावी.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | अभ्यासक्रम व वर्ष | परीक्षा शुल्क |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

एकुण विद्यार्थी एकुण परीक्षा शुल्क

(वार्षिक, अभ्यासक्रम (१००, ८०:२०), सत्रपध्दती अभ्यासक्रमातील (४०:१०Theory), (25:15 Theory + MCQ pattern) (MCQ Pattern) या सर्व अभ्यासक्रमाच्या अनुत्तीर्ण, ATKT व F-ATKT विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या तीनपेक्षा जास्त संधी संपल्यामुळे दि.१७.०५.२०१६ व दि.०७.१२.२०१० च्या परीपत्रकानुसार वरील सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना (सर्व विषयांसाठी, प्रात्यक्षिक व अंतर्गत गुणासह) नवीन सत्रपध्दती CBCS अभ्यासक्रमानुसार संपुर्ण विषयासाठी परीक्षा आवेदन पत्र भरणे आवश्यक आहे. तसेच प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष CGPA नंतर CBCS अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला आहे. CGPA च्या कांही विषयाच्या अभ्यासक्रमात बदल असल्यामुळे CGPA विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तीन संधी देवून त्यानंतर अनुत्तीर्ण होणा—या विद्यार्थ्यांना नवीन CBCS अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा देणे अनिवार्य राहील.

CGPA व्दितीय वर्ष (BA, B.Com, B.Sc) तृतीय सत्राच्या विद्यार्थ्यांना CGPA अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा देण्याची हिवाळी—२०१८ ही शेवटी संधी होती. चतुर्थ सत्रासाठी उन्हाळी— २०१९ ही CGPA अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा देण्याची शेवटची संधी राहील.

महत्वाची सूचना :— ज्या महाविद्यालयांत विद्यापीठ मान्यता प्राप्त प्राचार्य व प्राध्यापक यांची नेमणूक केलेली नाही अशा महाविद्यालयांना परीक्षेचे केंद्र दुस—या महाविद्यालयात देण्यात येईल. त्यामुळे अशा महाविद्यालय प्रशासनातर्फे परीक्षा केंद्राचे शुल्क रू. १५०/— प्रति विद्यार्थी शुल्क NEFT/RTGS ई—पेमेंटव्दारे अदा केल्यानंतरच उन्हाळी २०१९ परीक्षेचे परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागात स्विकारता येतील. परीक्षा केंद्राचे शुल्क विद्यार्थ्यांकडून घेऊ नयेत तसे आढळून आल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

तरी वरील सुचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

स्वा/—
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ